## अं.नि.अ.क्र.३/२०१९ मधील आय.ए. क्र. ४/२०२१ ते ६/२०२१ (निशाणी १६ ते १८) वरील संयुक्तीक आदेश

निशाणी १६ कडील अर्ज सामनेवाला क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी १७ कडील अर्ज सामनेवाला क्र. २ विरुध्द प्रकरण अवसान पावले तो आदेश रद्द करण्यासाठी आणि निशाणी १८ कडील अर्ज सामनेवाला क्र. २ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे असे म्हणणे आहे की सामनेवाला क्र. २ ही दि. १७/०१/२०१९ रोजी मयत झालेली आहे. सामनेवाला क्र. २ चे वारस मुदतीत दाखल न केल्याने सामनेवाला क्र. २ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. सामनेवाला क्र. २ ही मयत झाल्याची माहिती अर्जदाराला नव्हती. सामनेवाला क्र. २ चे मृत्यूप्रमाणपत्र तसेच वारसांची नावे व पत्ते त्यांना मिळण्यास त्यांना उशिर झाल्याने अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व सामनेवाला क्र. २ विरुध्द दावा अवसान पावल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे. सामनेवाला क्र. २अ ते २क यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जांना आक्षेप घेतलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर आहेत, अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत, अर्ज जाणूनबुजून विलंबाने दाखल केलेले आहेत. सबब, सदरचे अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावेत अशी त्यांनी विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. सामनेवाला क्र. २ ही मयत झाली या तथ्याबाबत सामनेवाला क्र. २अ ते २क यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. सामनेवाला क्र. २ च्या मृत्यूनंतर तिच्या कायदेशीर प्रतिनिधींविरुध्द अंतिम निवाडा अर्ज पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे.

त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक आहे. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

**०४.** सामनेवाला क्र. २ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच सामनेवाला क्र. २ विरुध्द अंतिम निवाडा अर्ज अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो. अर्जदारास मयत सामनेवाला क्र. २ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी अंतिम निवाडा अर्जामध्ये दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त अंतिम निवाडा अर्जाची प्रत सादर करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.03.05 18:58:37 +0530

दि. ०५/०३/२०२१ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

"CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT."

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER